नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा कॅरम स्पर्धा २०१८-१९ मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१९/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२,

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- १८ मार्च, २०१९.

<u>वाचा</u>:- १. केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ यांचे पत्र क्रमांक-५९/०२/ २०१६-१७/सीसीएससीएसबी, दि.०७.०२.२०१९.

२. महासचिव,सचिवालय जिमखान्या यांचे पत्र क्र. अभानासे/कॅरम/२०१८-१९, दि.०५.०३.२०१९.

३. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग,मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री /अभानासे/१८-१९/का-४/७६३, दि. ०७.०३.२०१९ .

<u>शासन निर्णय</u> :-

दि. ११ ते १५ मार्च, २०१९ या कालावधीत नवि दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा कॅरम स्पर्धा, २०१८-१९ मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता सचिवालय जिमखाना, मुंबई येथे दि. २ मार्च,२०१९ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेल्या राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे **रु.५६,२२५/- (रु. छपन्न हजार दोनशे पंचवीस फक्त)** इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. या साठी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किटबॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील, या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक/ व्यवस्थापक यांना दि. ०६ ते ०८ मार्च, २०१९ या कालावधीत प्रशिक्षण शिबिरासाठी व दि. ११ ते १५ मार्च, २०१९ या कालावधीत स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दि. ५ मार्च, २०१९ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे व या खेळाडूंच्या सेवा सचिवालय जिमखान्यास उपलब्ध करून देण्यात याव्यात. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. वित्त विभाग चा शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक ११ मे,१९८९ वक्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ मधील तरतूदींनुसार संघातील खेळाडू,

प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची दि. ५ ते १६ मार्च, २०१९ (प्रशिक्षण शिबीर,स्पर्धा व प्रवास) या काळातील कार्यालयीन अनुपस्थिती "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. या सर्वाचा प्रवासभत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या/ कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी/कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक- एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबईबाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास/ दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी. या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनात सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी “२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षितलेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र"ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१८१४४८२६३०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.18 14:53:19 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे
३. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई विभाग, मुंबई,

४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखावअनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय,मुंबई.
९. मानद महासचिव,सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०.संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११.निवड नस्ती (क्रीयुसे-२).

विवरणपत्र “अ”

दिनांक ११ ते १५ मार्च, २०१९ या कालावधीत गृह कल्याण केंद्र, कम्युनिटी सेंटर, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०१८-१९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कॅरम संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव व पदनाम	पुलओव्हर	किटबॅग	कार्यालय / विभागाचे नाव
पुरुष				
१	श्री.आशिष कुंभारे, लिपिक	होय	होय	आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२	श्री. जयवंत मोरे, कक्षसेवक	होय	होय	नवीन विधान भवन शाखा, सा.बां. खाते, मुंबई.
३	श्री. राजेश धुमाळे, वाहन चालक	होय	होय	कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, मुंबई उपगनर.
४	श्री. विजय दळवी, कक्षसेवक	नाही	नाही	अधीक्षक, आमदार निवास (सा.बां.) उपविभाग, मुंबई
५	श्री. आयुष अ. पुगावकर, लिपिक टंकलेखक	होय	होय	ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६	श्री. उदय शिंदे, जवान	होय	होय	राज्य उत्पादन शुल्क, मुंबई.
पुरुष वयस्क				
७	श्री. संजय वारंग, कक्ष अधिकारी	नाही	नाही	नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८	श्री. जावेद नाखवा, सहा. कक्ष अधिकारी	होय	होय	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
महिला				
९	श्रीमती रंजना वाघमारे, वरिष्ठ स्वीय सहाय्यक	नाही	नाही	सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०	श्रीमती कांचन मुरगुडकर, स्वीय सहाय्यक	होय	होय	विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
११	श्रीमती राजश्री खोत,	होय	होय	वस्तू व सेवाकर कार्यालय ,माझगांव ,मुंबई.
१२	आश्विनी धामापूरकर, सांख्यिकी सहाय्यक	नाही	नाही	उपायुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.
१३	श्रीमती आश्विनी बोरगे, कनिष्ठ लिपिक	होय	होय	मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर.
१४	श्रीमती कल्पना जाधव, शिपाई	होय	होय	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५	श्री. मारुती कवालदार व्यवस्थापक	होय	होय	महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.18 14:53:35 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र " ब"

दिनांक ११ ते १५ मार्च, २०१९ या कालावधीत गृह कल्याण केंद्र, कम्युनिटी सेंटर, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०१८-१९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कॅरम संघासाठी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र.

क्र.	तपशील	रुपये
अ)	**निवड चाचणी पूर्व तयारीसाठी खर्च** :-	५००/-
ब)	**निवड चाचणी आयोजनाचा खर्च.**	
१)	कॅरम पावडर रु. २५०/- प्रमाणे २ किलो.	५००/-
२)	पंचाना चहा, अल्पोपहार व जवेण यावरील खर्च.	१,५००/-
३)	१ मुख्य पंच व ३ सहाय्यक पंच यांना मानधन (१०००+५००x३)	२,५००/-
५)	१० कॅरम बोर्डाचे स्टॅन्डसहित भाडे, (एक दिवसाकरिता) (रु. ३००/- प्रति कॅरम याप्रमाणे १० कॅरमचे भाडे (३००x१०x१)	३,०००/-
६)	वाहतूक खर्च (ने-आण, हमालीसह) + वायरींग चार्जेस	२,०००/-
ब)	**प्रशिक्षण शिबीर** :	
१)	दिनांक ६ ते ८ मार्च, २०१९ या कालावधीत आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबीरासाठी ५ कॅरम स्टॅण्डसहित भाडे. (३ दिवसाकरिता) (रु.३००/- प्रति कॅरम प्रति दिन प्रमाणे) **(३००x५x३)**	४,५००/-
२)	वाहतूक खर्च (ने-आण, हमालीसह) + वायरींग चार्जेस	१,०००/-
३)	१४ खेळाडू व १ व्यवस्थापक यांना प्रशिक्षण कालावधीत अल्पोपहार.	३,०००/-
क)	**वैयक्तिक क्रीडा साहित्य**:-	
१)	१५ टि शर्टस् रु. ४००/- (मोनोग्रामसहित) प्रमाणे.	६,०००/-
२)	१५ ट्राऊझर रु. ४००/- प्रमाणे.	६,०००/-
३)	११ पूल ओव्हर डिलक्स क्वॉलिटी रु.४००/- प्रमाणे.	४,४००/-
४)	११ किटबॅग रु. ५००/- प्रमाणे.	५,५००/-
४)	१४ स्ट्रायकर्स रु.३००/- प्रमाणे.	४,२००/-
६)	१५ नॅपकिन्स रु. १००/- प्रमाणे.	१,५००/-
७)	१५ बूट रु. ५००/- प्रमाणे.	७,५००/-
८)	१५ पायमोजे रु. ७५/- प्रमाणे.	१,१२५/-
९)	संकीर्ण खर्च	१,०००/-
१०)	औषधे व प्रथमोपचाराकरिता खर्च.	५००
	एकूण रुपये :- (रु. छपन्न हजार दोनशे पंचवीस फक्त)	**५६,२२५/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.18 14:53:49 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र - क

दिनांक ११ ते १५ मार्च, २०१९ या कालावधीत गृह कल्याण केंद्र, कम्युनिटी सेंटर, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०१८-१९ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या कॅरम संघाची निवड करण्यासाठी दि. २ मार्च, २०१९ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले अधिकारी कर्मचारी खेळाडूंची नावे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	विभाग / कार्यालय
१	श्री. सुभाष आ. चव्हाण परिचर प्रतिरुप	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
२	श्री. आशिष कुंभारे, लिपिक	आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३	श्री. जयवंत दे. मोरे कक्ष सेवक	नवीन विधान भवन शाखा, सा.बां. खाते, मुंबई.
४	श्री. रविकांत घ. सतदेवे कनिष्ठ लिपिक	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, (कक्ष-५ (विचौ), मुंबई.
५	श्री. संदिप म. यादव, शिपाई	मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई.
६	श्री. सय्यद आ.स. मुनिरोद्दीन, करसहाय्यक	विशेष राज्य कर आयुक्त यांचे कार्यालय, आस्था-११, माझगांव, मुंबई.
७	श्री. हरिष कृ. कामतेकर, शिपाई	प्रशासकीय अधिकारी, कक्ष-४, (नागरी आस्थापना)
८	श्री. प्रदिन डा. वाघेला, सेवक	ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालय, सर ज.जी. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
९	श्री. प्रविण जयवंत झेंडे लिपिक टंकलेखक	सातारा सिंचन मंडळ, सातारा.
१०	श्री. ज्ञानदेव पु. आंबावले, कक्षसेवक	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
११	श्री. रुपेश गो. अहिरे, शिपाई	मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१२	श्री. आयुष अ. पुगावकर, लिपिक टंकलेखक	ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३	श्री. विजय कि. बगरे, अधीक्षक	अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.
१४	श्री. रजनीकांत एन. पंडित, सफाईगार	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
१५	श्री. उदय अ. शिंदे, जवान	राज्य उत्पादन शुल्क, मुंबई
१६	श्री. विजय शंकर दळवी, कक्षसेवक	अधीक्षक, आमदार निवास (सा.बां.) उपविभाग, मुंबई
१७	श्री. महेश ई. गायकवाड, चतुर्थश्रेणी कर्मचारी	औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची), दादर, मुंबई.
१८	श्री. निलेश म. गायकवाड, शिपाई	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९	श्री. सागर इवलेकर, लिपिक	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०	श्री. अनिल ना. शिंगाडे, विक्रीकर निरिक्षक	विक्रीकर विभाग, माझगांव, मुंबई.
२१	श्री. दिलीप पु. तायडे, शिपाई	तालुका कृषि अधिकारी अमरावती, कृषि संकुल विद्यापीठ रोड, अमरावती.
२२	श्री. समीर कावणकर, लिपिक टंकलेखक	अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई.
२३	श्री. जावेद नाखवा, सहा. कक्ष अधिकारी	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४	श्री. लक्ष्मण बा. यादव, सफाईगार	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
२५	श्री. राजेंद्र भा. खोसे, वरिष्ठ लिपिक	तालुका कृषि अधिकारी, अकोले, जिल्हा अहमदनगर.
२६	श्री. संतोष म. निर्गण, का. अधिक्षक	पो. आयुक्त, बृहन्मुंबई
२७	श्री. रमेश म. चौव्हान,सफाईगार	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
२८	श्री. संजय ना. वारंग, कक्ष अधिकारी	नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९	श्री.जनार्दन ल. खामकर, क्षेत्र सहाय्यक	सहाय्यक नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई जि.क्र.४, परेल, मुंबई.
३०	श्री. मारुती कवालदार, लिपिक	महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३१	सौ. कांचन म. मुरगुडकर, स्वीय सहाय्यक (वर्ग-२)	वस्तू व सेवाकर कार्यालय, नविन इमारत, माझगांव, मुंबई
३२	सौ. रंजना वि. वाघमारे, स्वीय सहाय्यक (वर्ग-१)	सहाकार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३३	कु. अश्विनी अ. बोरगे कनिष्ठ लिपिक	मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर.
३४	श्रीम. अश्विनी धामापूरकर, सांख्यिकी सहा.	उपायुक्त (नियोजन) उप आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
३५	श्रीमती कल्पना जाधव, शिपाई	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३६	श्रीमती राजश्री खोत, राज्यकर निरिक्षक	वस्तू व सेवाकर कार्यालय, माझगांव, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.03.18 14:54:25 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन